दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक-५

**आ. संजय केळकर यांची महिला भगिनींसाठी अनोखी भेट**

# जनकल्याण स्मार्ट कार्ड पाडणार सवलतींचा पाऊस

**ठाणे : सरकारच्या विविध शासकिय योजनांमधून महिलांच्या उद्धाराचे कार्य होत असताना ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने महिला विकास परिवार या सामाजिक संस्थेच्या वतीने महिलांना जनकल्याण स्मार्ट कार्ड देण्यात येणार आहे. महिलांना संसाराचा गाडा हाकण्यासाठी या मोफत जनकल्याण डिस्काऊंट कार्डचा हातभार लागणार आहे. शासकिय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत आमदार संजय केळकर यांनी ही माहिती दिली.**




जनसेवक आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने ठाणे शहरातील सर्व महिला भगिनी सदस्यांना देण्यात येणाऱ्या या जनकल्याण कार्डच्या माध्यमातून महिला भगिनी स्वत:साठी किंवा आपल्या कुटुंबासाठी दिलेल्या दुकानांच्या यादीमधून ज्या दुकानात खरेदी करतील तिथे त्यांना १५ ते ५० टक्क्यांपर्यंत विशेष सूट मिळणार आहे.

या आस्थापनांच्या यादीत साड्यांची नऊ, ड्रेस मटेरियल १८, मेन्स वेअर १२, किड्स वेअर तीन, स्टील व क्रॉकरी नऊ, ज्वेलरी घडणावळ आठ कॉस्मेटिक इमिटेशन सहा, फुटवेअर तीन, मोबाईल, आयटी स्टेशनरी तीन, पर्सेस-बॅग्स तीन, फर्निचर तीन, खेळणी युनिफॉर्म आणि मेडीकल स्टोअर प्रत्येकी एक अशा ८०हून अधिक दुकानांचा समावेश आहे. ठाणे शहरातील सर्व घटकातील गरजू महिलांना हे कार्ड वर्षभर वापरता येणार आहे तसेच त्याचे नंतर नूतनीकरणही करता येणार आहे.

याबाबत बोलताना आमदार संजय केळकर म्हणाले, मतांसाठी प्रासंगिक नाही तर सुरक्षा, सुविधा, सेवा आणि स्वयंरोजगार या चतु:सुत्रीवर मी वर्षभर महिला भगिनींच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून मुलींना ऑनलाइन शिक्षणासाठी मोफत क्लाउड ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याचा लाभ सुमारे अडीच हजार मुलींनी घेतला आहे. १०० गरीब-गरजू मुलींना मोफत अँड्रॉइड मोबाईल देण्यात आले. ७५० मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. दीड हजार मुलींना कॉम्प्युटर प्रशिक्षण देण्यात आले. स्वयं रोजगारासाठी दरवर्षी दिवाळी सणात महिला बचतगटाच्या २००-२५० महिलांना स्टॉलच्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळत असते. बचतगटाच्या २५ महिला चपाती-भाकरीची ऑनलाईन विक्री करतात. उत्तम पॅकिंग आणि गुणवत्ता असलेले हे अन्न पदार्थ घरपोच दिले जातात. यातून महिलांचे सक्षमीकरण होत आहे. सिव्हिल रुग्णालयात बाळंत महिलांना बाळंत विडा म्हणून आवश्यक साहित्याचे किट देण्यात येत आहे. हे उपक्रम वर्षभर राबवले जात असल्याची माहिती श्री.केळकर यांनी दिली.

पत्रकार परिषदेस आमदार संजय केळकर यांच्यासह महिला विकास परिवाराचे संयोजक पंढरीनाथ पवार, भाजपचे व्यापारी आघाडीचे ठाणे शहर अध्यक्ष मितेश शाह आदी उपस्थित होते.

# मुरबाड मधील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी गिरवले मूर्तीकामाचे धडे





**ठाणे :-** ग्रामीण भागातील मुलांमध्ये कलात्मक दृष्टिकोन आणि कलेबद्दल आसक्ती आहे. मात्र, त्यांना मंच मिळत नाही. हा मंच मिळवून देण्यासाठीच कलासिद्धी मुंबई आणि अर्थ स्टुडिओ, संगम, मुरबाड - यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शाडूच्या मातीपासून पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविण्याची मोफत कार्यशाळा नुकतीच जिल्हा परिषद केंद्र शाळा, अस्कोट, संगम, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे, येथे आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत पहिली ते आठवीतील जवळपास १०३ विद्यार्थी सहभागी झाले होते. केंद्र शाळेतील सुदर्शन पाटील, महेश शिंदे व मेघा पवार असे सर्व शिक्षकांचे आणि शाळेचे विश्वस्त सुरेश ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य या कार्यशाळेला लाभले.

शालेय स्तरावर अशा प्रकारची कार्यशाळा प्रथमच या विभागात आयोजित करण्यात आली होती. खास या कार्यशाळेसाठी मुंबईहून कलासिद्धी या संस्थेतर्फे अरुण आंबेरकर, उदय पटवर्धन, रेखा भिवंडीकर आणि अनिल लोंढे अशी नामांकित चित्रकार व शिल्पकार मंडळी, तर अर्थ स्टुडिओ तर्फे सुनील पुजारी (चित्रकार) हे सहभागी झाले होते.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४


# ओव्हरहेड वायरवर कोसळले झाड

## ६० घरांचा झाला होता दोन तासांसाठी वीज पुरवठा खंडित

**ठाणे :** कोकणी पाडा, संजय गांधी नॅशनल पार्क जवळ असलेल्या महावितरणच्या ओव्हरहेड वायरवरती मोठे झाड पडल्याची घटना शुक्रवारी सकाळी पावणे सात वाजण्याच्या सुमारास समोर आली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कोकणी पाडा परिसरातील

५० ते ६० ग्राहकांचा वीज पुरवठा दोन तास खंडित झाला होता. अशी माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली. महावितरणच्या ओव्हरहेड वायरवरती झाड पडल्याची माहिती दीपक आरज नामक व्यक्तीने ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षेत दिली. याची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरणचे कर्मचारी, वृक्षप्राधिकरण विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. ते पडलेले झाड कापून बाजूला करण्यात आले आहे. असेही त्यांनी सांगितले.



# मेडिकल दुकानात चोरी करणारी दुकली जेरबंद

**ठाणे :** ठाण्यातील कळवा,कल्याण आणि नवी मुंबईतील पनवेल भागातील दुकान फोडून तेथील रोकड लंपास करणाऱ्या उल्हासनगर येथील राजवीर संजू सिंग लाहोरी (१९) आणि क्रिश लोटवाणी (१९) या दुकलीला जेरबंद करण्यात कळवा पोलिसांना यश आले. तसेच त्या दुकली सात चोऱ्याच्या गुन्ह्यांची कबुली दिली असून त्यांच्याकडून पाच हजारांच्या रोकडसह एक मोटारसायकल असा ४५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती पोलिस उपायुक्त सुभाष बुरसे यांनी शनिवारी दिली. याशिवाय फरार असलेल्या त्यांच्या एका साथीदाराचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कळव्यातील औषध विक्रेत्या स्वाती केसरवाणी यांच्या पारसिकनगर येथील साईनिधी केमिस्ट या दुकानात २८ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शटर उचकटून दुकानात शिरकाव केला होता. त्यांच्या दुकानातील रोकड आणि लेडीज घडयाळ असा ऐवज लंपास करण्यात आला होता. याप्रकरणी २८ ऑगस्ट रोजी कळवा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३१ आणि ३०५ नुसार चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. हा गुन्हा दाखल झाल्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक उतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर धोंडे आणि उपनिरीक्षक सागर सांगवे यांची दोन पथके तयार करण्यात आली. याच पथकांनी घटनास्थळासह व आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली. त्याच आधारे यातील चोरट्यांचा चोरीसाठी येण्याचा आणि चोरीनंतर परत जाण्याचा मार्ग शोधून काढला. यातील आरोपींच्या ठावठिकाणाची माहिती उपनिरीक्षक सांगवे यांच्या पथकाला मिळाल्यानंतर स्थानिक रहिवाशांच्या मदतीने यातील चोरट्यांचा शोध घेतला. त्यानुसार राजवीर लाहोरी, क्रिश लोटवाणी या दोघांना २८ ऑगस्ट रोजी उल्हासनगरातील वरद कांबा, भागात सापळा रचून अटक करण्यात आली. चौकशीमध्ये त्यांनी कळव्यातील मेडिकल दुकानात चोरी केल्याची कबूली दिली. सखोल चौकशीमध्ये त्यांनी ठाणे, नवी मुंबई परिसरात अनेक ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केल्याचीही कबूली दिली. त्यांच्याकडून कळव्यातील या चोरीसह कल्याण रेल्वे पोलिस ठाणे, मानपाडा पोलिस ठाणे, टिटवाळा, महात्मा फुले चौक आणि पनवेल पोलिस ठाण्यांमध्ये दाखल असलेले ६ चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यांच्याविरुद्ध मध्यवर्ती पोलिस ठाण्यात चोरीसह हाणामारीचे असे दोन गुन्हेही यापूर्वीच दाखल असल्याचेही उपायुक्त बुरसे यांनी सांगितले.

# सप्टेंबरपासून ठाणे जिल्ह्यात २१व्या पशुगणनेला सुरुवात

## घरोघरी कुत्रे, गायी, म्हशींची होणार गणना

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात कुत्र्यांसह बकरे, गाई, बैल, शेळ्या-मेंढ्या आहेत. याची गणना सप्टेंबरमध्ये होणार आहे. घरोघरी आणि पशुपालन संस्थांमध्ये ही पशुगणना होणार आहे. त्यासाठी महापालिका सहाय्य करणार असून प्रथमच मोबाइलमार्फत ही गणना प्रगणक करणार आहेत. चार हजार घरामागे एका प्रगणकाला काम करावे लागणार असल्याची माहिती डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा पशसंवर्धन उपआयुक्त ठाणे, जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर यांनी दिली.

१९१९-२० पासून देशात वेळोवेळी पशुगणना करण्यात आली. तेव्हापासून ही जनगणना दर ५ वर्षांनी एकदा केली जाते. राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार्याने मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाने आतापर्यंत अशा २० जनगणना केल्या आहेत. पशुगणना केवळ धोरणकर्त्यांसाठीच नाही तर शेतकरी, व्यापारी, उद्योजक, दुग्धउद्योग, सर्वसामान्यांसाठीही फायदेशीर ठरते. यामुळे पशुधनासाठी धोरण आखणे सोप्पे जाते. २०वी पशुगणना २०१९ मध्ये झाली होती आणि आता ही गणना देशभरात होत असताना ठाणे जिल्ह्यात देखील केली जाणार आहे. राज्य सरकारचा पशुसंवर्धन विभाग आणि महापालिकेतर्फे गणना करताना महापालिकेकडून प्रगणक आणि पर्यवेक्षकांच्या नेमणुकाही करण्यात आल्या आहेत. तसेच या क्षेत्राशी निगडीत संस्थाचीही मदत घेण्यात येत आहे.पशुगणना करण्यासाठी ग्रामीण भागात ७२ प्रगणक, १४ पर्यवेक्षक असून एकूण ८६ कर्मचारी तसेच शहरी भागात २५६ प्रगणक, ४७ पर्यवेक्षक असून एकूण ३०३ कर्मचारी कार्यरत असणार आहेत. ४ हजार घरांमागे एका प्रगणकाला गणना करण्याची जबाबदारी असेल. तर दहा प्रगणकांमागे एक पर्यवेक्षक काम पाहणार आहे. मोबाइल ॲपमार्फत ही गणना होणार असून तो तीन महिने चालेल.

## आगामी विधानसभा निवडणुकीची हंडी आम्हीच फोडणार

ठाणे: दहीकाला उत्सवानिमित्ताने ठाणे शहरात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी विधानसभा निवडणुकीची हंडी आम्ही फोडणार असल्याचा दावा प्रसारमाध्यमांशी बोलताना केला आहे. त्यांनी अशाप्रकारे या उत्सवात दावा करून जणू प्रचाराचा नारळ वाढवला असल्याचे दिसून आले. दरम्यान ठाणे शहरातील दहीकाला उत्सवाला मराठी आणि हिंदी सिनेमासृष्टीतील लावून आलेल्या गोविंदांचा उत्साह शिगेला नेण्याचे काम केले. ठाणे शहरात सकाळपासून ठाण्यासह मुंबईतील गोविंदा पथकांनी धाव घेतली होती. शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांनी सुरु केलेल्या टेंभीनाका येथील दहीहंडी उत्सवात सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हजेरी लावली. यावेळी खासदार नरेश म्हस्के आणि शिवसेना पक्षातील पदाधिकारी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४
पान : ३

# यावर्षी गणेश मूर्ती विसर्जनासाठी ठाण्यात फिरती व्यवस्थाही सज्ज



## चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये ६ फिरत्या व्यवस्था

**ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रात यंदा गणेश मूर्ती विसर्जन करण्यासाठी सहा फिरत्या विसर्जन व्यवस्थांची व्यवस्था करण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या संकल्पनेतून ही व्यवस्था तयार झाली असून त्यात विसर्जनाची व्यवस्था असलेला ट्रक ठरलेल्या वेळी वेगवेगळ्या ठिकाणी फिरणार आहे. त्या ट्रकवरील टाकीत गणेश मूर्तींचे विसर्जन करता येणार आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, बांधकाम विभाग, पर्यावरण विभाग आणि घनकचरा विभाग यांनी विसर्जन व्यवस्थेचे नियोजन केले आहे. त्यात, ०९ विसर्जन घाट, १५ कृत्रिम तलाव, १० मूर्ती स्वीकृती केंद्र आणि ४९ ठिकाणी टाकी विसर्जन व्यवस्था आणि सहा फिरत्या विसर्जन व्यवस्था यांचा समावेश आहे.**

## ९ विसर्जन घाट, १५ कृत्रिम तलाव, १० मूर्ती स्वीकृती केंद्र, ४९ टाकी विसर्जन व्यवस्थाही सज्ज

फिरत्या विसर्जन व्यवस्थेमुळे नागरिकांना विसर्जनाची आणखी एक सुविधा उपलब्ध होणार आहे. ठाण्यातील गणेशोत्सव अधिकाधिक पर्यावरणपूरक असावा यासाठी महापालिकेचे प्रयत्न आहेत. त्याला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. तसाच तो या फिरत्या व्यवस्थेलाही मिळेल, असा विश्वास आयुक्त राव यांनी व्यक्त केला आहे.

यावर्षी, ०८ (दीड दिवस), १२ (सहा दिवस) आणि १४ सप्टेंबर (१० दिवस) अशा तीन दिवशी ही फिरती विसर्जन व्यवस्था नोपाडा-कोपरी, माजिवडा-मानपाडा, वागळे आणि वर्तकनगर या चार प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये उपलब्ध असेल. सकाळी १२ ते रात्री १० वाजेपर्यंत प्रभाग समितीमधील विविध ठिकाणी ठराविक काळासाठी हे फिरते वाहन विसर्जन व्यवस्थेसह उपलब्ध राहील. त्यावरील टाकीमध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करता येईल. या विसर्जन व्यवस्थेचे वेळापत्रक ठाणे महापालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात येईल, अशी माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली.

महापालिकेच्या ऑनलाईन आणि ऑफलाईन व्यवस्थेत महापालिका क्षेत्रातील एकूण २१४ मंडळांनी परवानगीसाठी अर्ज केले आहेत. त्यापैकी १८४ मंडपांच्या परवानगी देण्यात आल्या आहेत. उर्वरित मंडप परवानगीची प्रक्रिया सुरू असून त्या लवकरच दिल्या जातील, अशी माहिती आयुक्त राव यांनी दिली.

पावसाने आता चांगली उसंत घेतली आहे. त्यामुळे रस्ते दुरूस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. उड्डाणपूलांवर, आनंदनगर, ओवळा अशा काही भागात रस्ते खराब झाले आहेत. त्यावरील खड्डे तातडीने भरले जातील. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार जलद वाळणाऱ्या पद्धतीच वापर खड्डे बुजवण्यासाठी करण्यात आला. त्याचा चांगला परिणाम दिसला असल्याचेही आयुक्त राव म्हणाले.

गेल्यावर्षीपासून महापालिकेने कृत्रिम तलावांच्या सोबतीने छोट्या टाक्यांचीही व्यवस्था विसर्जनासाठी केली होती. त्यानुसार, गेल्यावर्षी ४२ ठिकाणी टाक्यांची सुविधा उपलब्ध होती. ती संख्या यंदा ४९ एवढी करण्यात आली आहे.

तसेच, जेल तलाव, मढवी हाऊस-राममारुती रोड, महागिरी कोळीवाडा, टेंभी नाका, रिजन्सी हाईट्स-आझादनगर, लोढा लक्झेरिया, कामगार हॉस्पिटल, किसन नगर बस स्टॉप, मॉडेला चेक नाका, देवदया नगर-शिवाई नगर या १० ठिकाणी मूर्ती स्वीकृती केंद्रे आहेत.

आंबेघोसाळे, मासुंदा दत्त घाट, खारीगाव, घोलाईनगर, दातिवली तलाव, खिडकाळी तलाव, न्यू शिवाजी नगर कळवा तलाव, निळकंठ वूड्स- टिकूजीनी वाडी, रेवाळे, बोरिवडे, ब्रम्हांड ऋतू पार्क, हिरानंदानी रायलादेवी-१, रायलादेवी-२, उपवन तलाव परिसर-वर्तकनगर, देवदयानगर अशा १५ ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे.

त्याचबरोबर, कोपरी, पारसिक रेती बंदर, रेतीबंदर -१, रेतीबंदर-२-राणानगर, फास्ट ट्रॅक ब्रिज, बाबाजी पाटील वाडी, शंकर मंदिर घाट, कोलशेत, बाळकूम अशा ०९ ठिकाणी विसर्जन घाटांची व्यवस्था आहे.

# चालू वर्षाच्या मागणी बिलासह थकीत पाणी बिल भरणा करणाऱ्या नागरिकांना प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट

## आयुक्त सौरभ राव



**ठाणे :** महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळसंयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह पूर्ण भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट लागू करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी आज दिली. थकीत पाणीपट्टी बिलावर १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

सदर योजना दि.१ सप्टेंबर २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट / सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

जे नागरिक दि.०१/०४/२०२५ आपली थकबाकीची रक्कम प्रलंबित ठेवणाऱ्या खातेदारांवर जप्ती कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन संबंधिताचे नळ संयोजन खंडीत करणे, मिटर रुम सिल करणे व पंप जप्ती अशी कारवाई होईल असे आयुक्त यांनी यावेळी नमूद केले. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावधी होणेसाठी प्रभाग समिती स्तरावर माहिती फलक लावण्यात यावेत व सदर योजना प्रभावीपणे राबवावी अशी सूचना आयुक्तांनी केली आहे.

या योजनेचा लाभ जास्तीत नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी केले आहे.



# तलाव येथे गणेश मूर्ती विसर्जन आणि छट पूजा यांच्यासाठी केली जाणार पुरेशी व्यवस्था

## महापालिका आयुक्त सौरभ राव आणि एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल यांनी केली रायलादेवी तलाव सुशोभीकरण कामाची केली पाहणी

**ठाणे :** रायलादेवी तलाव येथे गणेश मूर्ती विसर्जन आणि छट पूजा यांच्यासाठी लागणारी पुरेशी व्यवस्था केली जाणार आहे. या तलावाच्या सुशोभिकरणाचे काम एमएमआरडीएमार्फत केले जात आहे.

या कामाची पाहणी बुधवारी महापालिका आयुक्त सौरभ राव आणि एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल यांनी केली. त्यावेळी, माजी ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे आणि एकनाथ भोईर तसेच नागरिक उपस्थित होते.

तलावाच्या सुशोभिकरणाचे काम वेगाने सुरू आहे. अंफी थिएटर, तसेच एका बाजूच्या पायवाटेचे काम झाले आहे. या कामाची पाहणी केल्यानंतर, गणेश मूर्ती विसर्जन तसेच छट पूजा यांच्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी लक्षात घेवून त्याप्रमाणे व्यवस्था करण्याच्या सूचना महानगर आयुक्त मुदगल यांनी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

तसेच, ही कामे योग्य वेळेत पूर्ण करण्यात यावीत. त्यात कोठेही गुणवत्तेत तडजोड करू नये, असे महापालिका आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

विसर्जन आणि छट पूजेसाठी येथे येणाऱ्या हजारो भाविकांना चांगल्या सुविधा मिळतील. सुशोभीकरण झाल्यावर येथे यापूर्वीपेक्षा अधिक जागा भाविकांसाठी उपलब्ध होणार आहे. त्याचवेळी, भाविकांनीही सुशोभित तलावाची काळजी घ्यावी, अशी अपेक्षा माजी ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे आणि एकनाथ भोईर यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी, महापालिकेचे नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपनगर अभियंता विकास ढोले, शुभांगी केसवानी, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान आदी अधिकारी उपस्थित होते.



# वाढवण बंदर हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे शिखर ठरणार - मुख्यमंत्री शिंदे

- १२ लाखांपेक्षा जास्त तरुणांना मिळणार रोजगार
- जगातील १० मोठ्या बंदरातील वाढवण मोठे बंदर

पालघर : महाराष्ट्रासह देशाच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोलाचे ठरणाऱ्या वाढवण बंदराचे भूमिपुजन होत आहे. वाढवण बंदर हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे शिखर ठरणार आहे. या बंदरामुळे जगातील पहिल्या दहा कंटेनर पोर्टच्या यादीत भारताचे नाव समाविष्ट होणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासाला चालना मिळणार असून १२ लाखापेक्षा जास्त युवकांना रोजगार मिळणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालघर येथे केले.

७६,२०० कोटी रुपये खर्चाच्या वाढवण बंदराचा पायाभरणी समारंभ तसेच १५६३ कोटी रुपयांच्या मत्स्यव्यवसाय प्रकल्पाचे व योजनांचे लोकार्पण व शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पालघरमधील सिडको मैदानात आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय बंदर विकास, जहाज व जलवाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल, केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय बंदर विकास, जलमार्ग राज्यमंत्री शंतनू ठाकूर, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण, सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, बंदर विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, खासदार डॉ. हेमंत सावरा, आमदार श्रीनिवास वनगा, आमदार निरंजन डावखरे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेश वाघ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील, अपर जिल्हाधिकारी भाऊसाहेब फटांगरे, निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते स्थानिक मच्छिमार, शेतकऱ्यांना ट्रान्सपॉंड व किसान क्रेडिट कार्डचे वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, वाढवण बंदर महत्वाकांक्षी प्रकल्पाला पूर्ण करण्यासाठी आमची प्राथमिकता असणार आहे. २०४७ मध्ये विकसित भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी मुंबई महानगर प्रदेश एक पॉवर हाऊस असणार आहे. ज्यात शहराच्या विकासाबरोबरच पायाभूत प्रकल्पाचा विकास होणार आहे. वाढवणसह आणगाव सापे आणि दिघी इथे औद्योगिक नगरी विकसित केल्या जातील. हाय-ग्रोथ इंडस्ट्रीयल हब म्हणून त्यांचा विकास केला जाईल. ज्यातून उत्पादन क्षेत्र म्हणून आणि मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीचा परिसर म्हणून तीन ठिकाणी मिळून हजार कोटी डॉलर्सची गुंतवणूक होईल,अशी अपेक्षा आहे.

वाढवण बंदर व दिघी बंदरांच्या सुविधा विकासावर भर देण्याचे नियोजन आहे. निती आयोगाच्या माध्यमातून एमएमआर परिसराचा विकास करण्यात येत आहे. निती आयोगाने एमएमआर विकासाचा अहवाल सादर केला आहे. निती आयोगाने केलेल्या अभ्यासात मुंबई महानगरासह पालघर, रायगड, ठाणे या जिल्ह्यांचा समावेश असलेल्या परिसराचा विकास डोळ्यासमोर ठेवला आहे. त्यासाठी वाढवण बंदर महत्वाची भूमिका बजावणार आहे. निती आयोगाने सात विकास क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत केले आहे.या सात विकास क्षेत्रांपैकी एमएमआरमधील बंदरांचा एकात्मिक विकास करून उद्योग आणि लॉजिस्टीक हब करणे याला प्राधान्य दिले जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

वाढवण बंदरामुळे निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी स्थानिकांनाच मिळाव्यात यासाठी जेएनपीएच्या माध्यमातून आतापासूनच प्रयत्न केले जात आहेत. बंदराच्या ठिकाणी निर्माण होणाऱ्या रोजगारांसाठी लागणाऱ्या कौशल्याचे प्रशिक्षणाचे कार्यक्रम निश्चित केले गेले आहेत. पालघर जिल्ह्यातील बंदर परिसरातील तालुक्यांतील तरुणांसाठी हे प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. वाढवण बंदरामुळे महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वाढण्यास निश्चित मदत होणार आहे, असेही शिंदे यावेळी म्हणाले

# गणेशोत्सवात रेल्वे स्थानकांवर गणेश पंचरत्न प्रसारित करावे



## खासदार नरेश म्हस्के यांचे रेल्वेमंत्र्यांना आवाहन

**ठाणे :** गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा सण असून यानिमित्ताने सर्वत्र आनंदाचे, उत्साहाचे आणि मंगलमय वातावरण असते. या भक्तीमय वातावरणात रेल्वे प्रशासनानेही सर्व रेल्वे स्थानकांवरील ध्वनिक्षेपण यंत्रणेवर श्री गणेशाच्या प्रार्थना, श्लोक आणि गाणी प्रसारित करावीत, असे आवाहन ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना केले आहे.

श्री गणेशाची महती वर्णन करणारे अनेक श्लोक, काव्य आणि गाणी आहेत. आदि शंकराचार्य रचित 'गणेश पंचरत्न' त्यापैकी एक. ज्येष्ठ पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांनी नुकतेच लंडन येथील हाऊस ऑफ कॉमनमध्ये हे स्तुती काव्य गायले. त्याची ध्वनिफित रेल्वे प्रशासनाला प्रसारणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही खासदारांनी कळवले आहे. ती सर्वत्र प्रसारित करता येईल. तसेच या व्यतिरिक्त अन्य जुनी-नवी श्रीगणेश गीते रेल्वे स्थानकांमध्ये प्रसारित, अशी विनंती खासदारांनी रेल्वे प्रशासनाला केली आहे.

# महाराजांच्या पुतळा दुर्घटनेच्या निषेधार्थ ठाण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मूक आंदोलन




ठाणे : महाविकास आघाडीनंतर गुरुवारी ठाण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा दुर्घटनेच्या निषेधार्थ मूक आंदोलन केले. यावेळी, ही घटना संतापजनक आणि मनाला वेदना देणारी आहे. महाराष्ट्रातल्या जनतेमध्ये संतापाची लाट या घटनेमुळे पसरली आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री तसेच गृहखाते सांभाळणारे देवेंद्रजी फफडणवीस या दोन्ही नेत्यांना विनंती आहे की, या दुर्घटनेसाठी जबाबदार असलेले शिल्पकार, कन्सल्टन्ट, कंत्राटदार, सरकारी पीडब्लूडीचे अधिकारी या सर्व संबंधितांवर कठोर कारवाई करायला हवी आणि ही कारवाई शब्दातून नाही तर कृतीतून महाराष्ट्रातील जनतेला दिसायला हवी. तसेच लवकरात लवकर तिथे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पुन्हा उभारायला हवा, हे काम महायुतीने त्वरित करायला हवे. कालच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेची या घडलेल्या घटनेबद्दल जाहीर माफी मागितली आहे. आम्ही जरी सत्तेत असलो तरी झालेल्या दुर्दैवी घटना ही संतापजनक आहे. असे मत माध्यमांशी संवाद साधताना प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी व्यक्त केले. ठाण्यातील तलावपाळी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळ्याजवळ राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश प्रवक्ते, ठाणे व पालघर समन्वयक, ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांच्या नेतृत्वाखाली मूक आंदोलन करण्यात आले, याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष दत्ता चव्हाण, जिल्हा सरचिटणीस प्रभाकर सावंत, रविंद्र पालव, महिला अध्यक्षा वनिता गोतपागर, महिला कार्याध्यक्ष मनिषा भगत, परिवहन समिती सदस्य नितीन पाटील, युवक प्रदेश पदाधिकारी आदित्य धुमाळ, युवक कार्याध्यक्ष संदेश पाटील, विद्यार्थी अध्यक्ष कौस्तुभ गायकवाड, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष मंगेश सुर्यवंशी, अल्पसंख्यांक विभागाचे कार्याध्यक्ष रिकी मुरझेलो, आरोग्य सेल अध्यक्ष अविनाश पवार, विधानसभा अध्यक्ष अजय सकपाळ, विजय भामरे, महिला विधानसभा अध्यक्षा सुवर्णा खिल्लारी, युवती विधानसभा अध्यक्षा नेहा नाईक, सोनिया माने तसेच सर्व जिल्हा कार्यकारिणी सदस्य, विधानसभा अध्यक्ष, कार्याध्यक्ष, ब्लॉक अध्यक्ष, कार्याध्यक्ष, वॉर्ड अध्यक्ष तसेच सर्व फ्रंटल विभाग, सेलचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# एसटी इंटकच्या ठाणे अध्यक्षपदी सुर्याजी इंगळे

**ठाणे :** महाराष्ट्र एसटी वर्कर्स कॉंग्रेस (इंटक) च्या ठाणे विभागाची कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली असुन ठाणे विभागाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कार्यकर्ते सुर्याजी इंगळे यांची तर सचिवपदी विजय तारमळे यांची एकमताने नियुक्ती करण्यात आली.

ठाणे विभागाच्या अध्यक्षपदी कॉंग्रेस प्रवक्ते सचिन शिंदे यांच्या आकस्मित झालेल्या निधनानंतर अध्यक्ष पद रिक्त झाले होते. त्यानंतर ही नियुक्ती करण्यात आली आहे.ठाणे विभागातील इंटक कार्यकर्त्यांनी विभागाच्या कार्यकारिणी ची पुनर्रचना केली असुन २८ ऑगस्ट रोजी नवीन विभागीय कार्यकारिणी विभाग नियंत्रक कार्यालयाला सुपुर्द केली आहे. कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ कार्यकर्ते शामराव भोईर, खजिनदार पदी रत्नाकर खोळंबे ,महिला संघटक म्हणून ललीता खरे, काव्या कुणाल पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ठाणे विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी आक्रमकपणे लढण्याची स्व.बाळकृष्ण पुर्णेकर ,स्व. सचिन शिंदे यांनी सुरू करुन दिलेली परंपरा इंटक पुन्हा एकदा तितक्याच आक्रमकपणे सुरू ठेवेल असे नवनियुक्त अध्यक्ष सुर्याजी इंगळे यांनी नमुद केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४


# परीक्षेत भाषा विषयात सर्वाधिक गुण प्राप्त करणाऱ्या ठाण्यातील विद्यार्थ्यांचा ठाणे महानगरपालिकेकडून सन्मान




**ठाणे :** शालांत परीक्षा मार्च २०२४ मध्ये भाषा विषयात सर्वाधिक गुण प्राप्त केलेल्या ठाणे महापालिका क्षेत्रातील शाळांमधील विद्यार्थ्यांचा आज ठाणे महानगरपालिकेच्या वतीने सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार यांच्यासह विद्यार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

संस्कृत भाषेसाठी ऋजुला पाटील - गुण-१०० (ए.के.जोशी इंग्लीश मिडीयम स्कूल, ठाणे), इंग्रजी भाषेसाठी सृष्टी पाटील गुण - ९८ ( श्रीरंग विद्यालय), मराठी भाषेसाठी श्रियांश गावकर - गुण ९९ (सी. पी. गोयंका इंटरनॅशनल स्कूल), गुजराती भाषेसाठी राठोड कशिश अमितभाई - गुण ८३, (शेठ टी. जे. हायस्कूल, ठाणे) हिंदी भाषेसाठी साहिल बाबू शाह -गुण ९५ (वेद हिंदी हायस्कूल) उर्दु भाषेसाठी कु. अन्सारी शिफा अमिरउल हसन -गुण ९४ (शोएब उर्दु हायस्कूल) या विद्यार्थ्यांना अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांना ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दोन हजार रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व ग्रंथबुके देवून गौरविण्यात आले.




# ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरणासाठी १५ सप्टेंबर पर्यंत मुदत

**ठाणे :** ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत ड्रायव्हींग लायसन्सचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. ज्या वाहन चालकांनी मानवी स्वरूपात अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे. अशा वाहन चालकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत अनुज्ञप्तीचे (ड्रायव्हींग लायसन्स) संगणक प्रणालीद्वारे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतर करण्याचे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळसकर यांनी केले आहे.

१५ सप्टेंबर नंतर मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण केले जाणार नाही याची अनुज्ञप्ती धारकांनी नोंद घ्यावी. मुंबई (मध्य) ताडदेव येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) परिसरात कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, आय ॲण्ड सी सेंटर, वाहन चालक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम होणार आहे. या कार्यालयाकडून नोव्हेंबर २००६ पूर्वी जारी करण्यात आलेल्या सर्व अनुज्ञप्ती धारकांना अनुज्ञप्ती मानवी स्वरूपातच आहे. अशा अनुज्ञप्ती धारकांनी १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत या कार्यालयामध्ये येऊन आपले अनुज्ञप्तीचे संगणक प्रणालीमध्ये बॅकलॉग करून घ्यावे. व मानवी स्वरूपातील अभिलेखाचे स्मार्ट कार्डमध्ये रूपांतरण करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

# दुसऱ्या टप्प्यात ठाण्यातील एक लाख महिला ठरल्या पात्र

## ठामपातर्फे झाली छाननी प्रक्रिया

**ठाणे :** राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'साठी अर्ज केलेल्या महिलांच्या, दुसऱ्या टप्प्यातील एक लाख अर्जांची छाननी ठाणे महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अहोरात्र काम करून वेळेत पूर्ण केली आहे. त्यामुळे आता ठाण्यातील एकूण लाभार्थी महिलांची संख्या सुमारे २ लाख झाली आहे.

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या निर्देशानुसार महापालिका अधिकारी आणि कर्मचारी यांचे आवश्यक मनुष्यबळ तसेच संपूर्ण तांत्रिक व्यवस्था महापालिका मुख्यालयात तीन सभागृहात सज्ज करण्यात आली होती. येथे तीन दररोज तीन सत्रांमध्ये अखंडीतपणे काम करून जमा झालेल्या सर्व अर्जांची विगतवार ऑनलाईन तपासणी करण्यात आली. त्यासाठी संगणक संचांचे अद्ययावत नेटवर्क तयार करण्यात आले होते.अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या नेतृत्वाखाली उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (समाजविकास) अनघा कदम, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी विवेक चौधरी यांनी प्रत्येक सत्रात होणाऱ्या अर्ज पडताळणीचे नियोजन केले. त्यात सूत्रबद्धता आणून जलद गतीने काम मार्गी लावले. त्याचबरोबर, महापालिकेच्या सर्व, नऊ प्रभाग समिती कार्यालयांत सहायक आयुक्त यांनीही अशाच प्रकारचे नियोजन केल्याने अर्ज छाननी प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यात आली.

राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या महत्त्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीसाठी ठाणे महापालिकेने प्रभाग समितीनिहाय १३७ मदत केंद्रे सुरू केली आहेत. या सर्व मदत केंद्रांवर आलेले अर्ज तसेच ऑनलाईन प्राप्त झालेले अर्ज यांची ऑनलाइन पद्धतीने पात्रता निश्चिती करण्यात आली. त्यात, ठाणे महापालिका हद्दीतील अर्जांचा समावेश होता.

ठाणे महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी छाननीचे काम अतिशय वेगाने आणि नियोजनबध्द रीतीने केले. त्यामुळे दोन्ही टप्प्यात मिळून आतापर्यंत सुमारे दोन लाख महिला लाभार्थी झाले आहेत. ३१ ऑगस्टपर्यंत त्यात आणखी भर पडेल, असा विश्वास, महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी व्यक्त केला आहे.

# ठामपाचे दोन लाचखोर लिपिक एसीबीच्या जाळ्यात

**ठाणे :** जन्मदाखला देण्याकरिता ४०० रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग समितीमधील रणजित पांडूरंग मगदूम (४२) आणि निखील मोतीराम कडव (२४) या दोन्ही लिपिकांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) ताब्यात घेतले आहे. ही कारवाई बुधवारी करण्यात आली असून याप्रकरणी डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती ठाणे एसीबीने दिली.

तक्रारदारांनी त्यांची नात हिचा जन्मदाखला मिळावा, याकरीता त्यांनी दिवा प्रभाग समितीत अर्ज केला होता. त्यानुसार लिपिक रणजित मगदूम यांनी दाखला देण्यासाठी तक्रारदारांकडे ५०० रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानुसार तक्रारदारांनी २६ ऑगस्ट २०२४ रोजी ठाणे एसीबी कार्यालयात लेखी तक्रार केली. त्याच्या अनुषंगाने २८ ऑगस्ट २०२४ रोजी पडताळणी कारवाईमध्ये लिपिक रणजित मगदूम यांनी तक्रारदारांकडे लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४०० रुपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच ती रक्कम त्यांनी लिपिक निखील कडव यांच्यासाठी स्विकारल्यानंतर त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस उप अधीक्षक प्रगती अडसुरे करत आहेत.

दिवा न्यूज
दिशादर्शक, मार्गदर्शक!
www.diwanews.com
सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४


# गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिसांनी दक्ष राहावे-पालकमंत्री शंभूराज देसाई



**ठाणे :** ठाणे जिल्ह्यात लागोपाठ येणाऱ्या गणेश विसर्जन मिरवणुका व ईद-ए-मिलादच्या मिरवणुका शांततेत संपन्न व्हाव्यात, यासाठी पोलीस, महानगरपालिका व जिल्हा प्रशासनाने दक्ष राहण्याच्या सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज येथे दिल्या तर नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक व ईद-ए-मिलाद च्या मिरवणुकीसंदर्भात जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हा प्रशासन, पोलीस व महानगरपालिका प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी आमदार गीता जैन, राजू पाटील, शांताराम मोरे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सहआयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ. डी.एस.स्वामी, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ.इंदूराणी जाखड, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त विकास ढाकणे, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, ठाणे महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त डॉ.प्रशांत रोडे, पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, तिरूपती काकडे, रश्मी नांदेडकर, मीना मकवाना, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी गोपीनाथ ठोंबरे, तहसिलदार डॉ.आसावरी संसारे, रेवण लेंबे व इतर अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री महोदयांनी जिल्ह्यातील पोलीस बंदोबस्त, मनुष्यबळाची उपलब्धता, कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात केलेल्या उपाययोजना, विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, विसर्जनस्थळाच्या सुविधा याबद्दल सर्व पोलीस आयुक्तालये व महापालिकांकडून सविस्तर माहिती घेतली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पालकमंत्री श्री.देसाई म्हणाले की, महानगरपालिका व नगरपरिषद हद्दीतील रस्त्याचे खड्डे १०० टक्के भरण्यात यावे. पाऊस कमी झाला आहे, नालेसफाई तात्काळ करुन घ्यावी. नाले जर अगोदर तुंबले असतील तर पाणी रस्त्यावर येते. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. यासाठी आवश्यक तेथे नाल्यांची स्वच्छता करून घ्यावी. २४ तास विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्यावी. विद्युत विभागाने दुरूस्तीची कामे तात्काळ पूर्ण करुन घ्यावीत.

ते पुढे म्हणाले की, मोठ्या गणेशोत्सवामध्ये गर्दीच्या ठिकाणी पुरेसा बंदोबस्त ठेवावा. महिलांची छेडछाड होणार नाही याची दक्षता घ्यावी. श्रींच्या आगमनाच्या व विसर्जनाच्या मिरवणूकीच्या वेळी वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मिरवणूका शांततेत पार पडायला हव्यात. विसर्जनाच्या ठिकाणी वॉर्ड अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. कृत्रिम तलावामध्ये पुरेसा पाणीसाठा ठेवावा. जेणेकरुन मूर्ती विसर्जन व्यवस्थित होईल, मूर्तीची विटंबना होणार नाही याची पूरेपूर काळजी घ्यावी.

पोलिसांनी गस्तीचे प्रमाण वाढवावे. गणेशोत्सव काळात एकही अनुचित प्रकार घडू नये, याची काळजी घ्यावी. लेझर लाईटचा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो, त्यामुळे या लेझर लाईटबाबत आपल्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा. विसर्जनाच्या मिरवणूकीमध्ये आवाजाची मर्यादा मोडली जाते, प्रकृतीला इजा होईल अशा प्रकारे आवाजाचा डेसिबल वाढू नये, याची दक्षता घ्यावी, असे सांगून उत्सवात कोणतीही आडकाठी आणू नये. सामान्य नागरिकांना त्रास होणार नाही, याची सर्वोतोपरी काळजी घ्यावी. महिला, बालके यांच्यासह सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व खबरदारी पोलीस विभागाने घ्यावी, असेही श्री.देसाई यांनी यावेळी सांगितले. जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी यावेळी पालकमंत्र्यांना सांगितले की, गणेशोत्सवासंदर्भात ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका आयुक्त व सर्व यंत्रणांची बैठक घेवून सर्व संबंधितांना आवश्यक त्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४



www.diwanews.com

# दिवा शहर वर्षा मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद
















**दिवा :** शिवसेना दिवा शहर व धर्मवीर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने काल दिवा शहरात भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर मॅरेथॉन स्पर्धेला आठ हजारापेक्षा जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. शिवसेना दिवा शहरप्रमुख, मा. उपमहापौर रमाकांत मढवी यांनी या मॅरेथॉन चे आयोजन केले होते. सलग पाच वर्षे आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेला अनेक मान्यवरांनी भेट दिली. शिवसेना डोंबिवली शहरप्रमुख राजेश मोरे, उपतालुका प्रमुख बंडू पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.





### पाच गटात संपन्न झालेल्या या स्पर्धेत

**महिला खुल्या गटात**
१) प्रीती भाके २) शिवानी गोरे ३) साक्षी मोरे.

**पुरुष खुल्या गटात**
१) अभिषेक आगरे २) साहील वालूनू ३) अशान यादव

**दोन किलोमीटर विद्यार्थी गटात**
१)अथर्व दुर्गावणे २)गौरेश भोसले ३)आकाश शिंदे,

**मुली**
१) पूजा यादव २)अश्विनी यादव ३) सिमरन गुप्ता

**दीड किलोमीटर मुले**
१)प्रिन्स राय २)किशन निषाद ३)तनिष यादव

**मुली**
१) गार्गी गुप्ता २)मनस्वी जयस्वाल ३) सरस्वती सिंग

**एक किलोमीटर विद्यार्थी**
१) निखिल दळवी २) गणेश काजबळे ३) दिव्यांश पांडे,

**मुली** १)रिया करंबळे २)पलक पटवा ३) ज्योती यादव

या विजेत्यांनी क्रमांक पटकावले. सकाळी सात वाजता सुरू झालेल्या या स्पर्धेला सहभागी होणाऱ्या खेळाडूंसहित दिवेकरांनी प्रचंड गर्दी केली होती. सदर मॅरेथॉन स्पर्धा यशस्वी होण्यासाठी शिवसेना नगरसेवक शैलेश पाटील, दीपक जाधव, नगरसेविका दिपाली भगत, दर्शना म्हात्रे, उपशहर प्रमुख आदेश भगत, गणेश मुंडे, युवती शहर अधिकारी साक्षी मढवी, विभाग प्रमुख उमेश भगत, चरणदास म्हात्रे, गुरुनाथ पाटील, विनोद मढवी, शशिकांत पाटील, भालचंद्र भगत, निलेश पाटील, अरुण म्हात्रे, राजेश पाटील, जगदीश भंडारी, सचिन चौबे, विनोद पाटील सर, सर्व उपविभागप्रमुख, शाखाप्रमुख व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली.